# दुचाकी चोरणारे चोरटे पोलीस स्टेशन वर्धा शहर येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

फिर्यादी नामे सौ. तरूणा राम खेडकर, रा. सोनेवाडी वर्धा यांचे पती श्री राम खेडकर हे सामान्य रूग्णालय, वर्धा येथे कोविड-१९ ची तपासणी करण्याकरीता त्यांचे मालकीचे टीव्हीएस ज्यूपीटर सिल्वर रंगाची मोपेड गाडी क्र. एमएच-३२/एपी-४९६४ नी गेले होते. तेव्हा त्यांनी त्यांची मोपेड गाडी वार्ड क्रमांक ५३ जवळ उभी करून तपासणी करीता गेले. तपासणी करून परत मोपेड गाडी ठेवल्या ठिकाणी आले असता त्याची मोपेड गाडी दिसुन आली नाही. फिर्यादी यांनी दिनांक ११/०४/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. वर्धा शहर येथे अप. क्र. ३९५/२०२१ कलम ३७९ भादंविचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा तपासावर असतांना मुखबिर कडुन मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आरोपी नामे १) ऐबाज शेख युसुफ शेख, वय २१ वर्ष, रा. हनुमान मंदीराजवळ, वार्ड क्र. २६, पुलफैल, वर्धा २) आफताब अलि सैय्यद अख्तर अलि, वय २१ वर्ष, रा. मॉंडेल हायस्कुल जवळ तारफैल, वर्धा याना दयाल नगर, देवळी नाका, वर्धा येथुन ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेली टी.व्ही.एस. ज्यूपीटर सिल्वर रंगाची मोपेड गाडी क्र एमएच-३२/एपी-४९६४ किंमत ६५,०००/- रू ची जप्त केली व आरोपी अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री सत्यवीर बंडीवार यांचे निर्देशानुसार पोलीस अंमलदार शशीकांत जयस्वाल, सचिन इंगोले, दिपक जंगले, राजेंद्र ढगे, सलमान शेख यांनी केली.